महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

# महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७

(दिनांक १५ ऑगस्ट १९८५ पर्यंत सुधारलेला)

MAHARASHTRA ACT No. XX OF 1978

# The Maharashtra Employment Guarantee Act, 1977

*( As modified to 15th August 1985 )*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
१९८५

[ किंमत रु. १·५० ]

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७

(दिनांक १५ ऑगस्ट १९८५ पर्यंत सुधारलेला)

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २. | व्याख्या | २ |
| ३. | ग्रामीण क्षेत्रातील प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देणे | २ |
| ४. | राज्य परिषद व तिची कामे | ३ |
| ५. | जिल्हा व पंचायत समितीच्या पातळीवरील समित्या व त्यांची कामे | ३ |
| ६. | योजनेच्या प्रत्येक जिल्ह्यातील अंमलबजावणीस जिल्हाधिकारी जबाबदार असणे | ३ |
| ६अ. | प्रत्येक विभागातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे आयुक्ताचे अधिकार | ४ |
| ७. | योजना तयार करणे व ती प्रसिध्द करणे | ४ |
| ७-अ. | प्रसूती व निर्बीजीकरण शस्त्रक्रियांच्या बाबतीत आणि सोबतच्या मुलांना अपघात होणे इ. बाबतीत रजा व सानुग्रह प्रदानाची तरतूद. | ६ |
| ८. | हमी दिलेल्या रोजगारासाठी, ग्रामीण क्षेत्रांमधील प्रौढ व्यक्तींना लागू असणाऱ्या शर्ती | ७ |
| ९. | इतरत्र रोजगार असताना बेकारी भत्ता घेतल्याबद्दल शास्ती | ९ |
| १०. | समिती अधिकारी व त्यांची कामे | ९ |
| ११. | इतर कामांवरील रोजगारासाठी तरतूद | १० |
| १२. | रोजगार हमी निधीची स्थापना आणि योजनेसाठी त्याचा वापर करणे | १० |
| १३. | विवक्षित अधिनियमांतील सुधारणा व इतर कायद्यामधील योजना व निधी यांच्या निर्देशांचा अर्थ लावण्यासाठी नियम. | ११ |
| १४. | अधिकारांचे प्रत्यायोजन | ११ |
| १५. | सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण देणे | ११ |
| १६. | अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे | ११ |
| १७. | नियम तयार करण्याचे अधिकार | १२ |
| | अनुसूची | १२ |

## सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०[1]

# महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७

[राष्ट्रपती यांची दिनांक १-१०-१९७८ रोजी अनुमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३ ऑक्टोबर १९७८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (दिनांक २४ नोव्हेंबर १९८०) †§.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९८३ चा महा. अधि. क्र. ४७.

**महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण क्षेत्रात अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी स्वतः होऊन तयार असलेल्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ४१ मध्ये घालून दिलेला, त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** समाजाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या लाभासाठी जी टिकाऊ मत्ता होऊ शकेल अशा कामांवर अशा प्रौढ व्यक्तींना नेमणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** कुटीरोद्योग, ग्रामोद्योग आणि लघुउद्योग व कृषि-उद्योग यांमध्ये, अधिक ग्रामीण मनुष्यबळासाठी रोजगार देण्याचे चालू ठेवण्याकरिता तरतूद करणेही आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी**, विवक्षित पूरक, आनुषंगिक आणि परिणामरूप तरतुदी करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ असे म्हणावे.

(२) तो महाराष्ट्र राज्याच्या सर्व ग्रामीण क्षेत्रांना लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील अशा तारखेस[2] अंमलात येईल.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७७, भाग पाच असाधारण, पृ. १७९ (इंग्रजी) पहा.

† अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

§ सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५, सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ अन्वये निरसित करण्यात आला.

[2] दिनांक २६ जानेवारी १९७९. पहा :—शा. नि. पी. डी. क्र. इजीएस-१०७७-८७-इएमपी-५, दिनांक २५ जानेवारी १९७९.

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(अ) "प्रौढ व्यक्ती" म्हणजे अठरा वर्षे वयाची व्यक्ती ;

(ब) "समिती" म्हणजे कलम ५ अन्वये स्थापन केलेली जिल्हा पातळीवरील समिती किंवा यथास्थिती, पंचायत समिती पातळीवरील समिती ;

(क) "परिषद" म्हणजे कलम ४ अन्वये स्थापन केलेली महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद ;

(ड) "अंमलबजावणी अभिकरण" यात, राज्य शासनाकडून, या योजनेखालील कोणत्याही कामाच्या अंमलबजावणीचे कार्य ज्याच्याकडे सोपविण्यात आले आहे असा, राज्य शासनाचा कोणताही विभाग, जिल्हा परिषद, कोणतेही इतर स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासनाचा उपक्रम यांचा समावेश होतो ;

(ई) "अंमलबजावणी अधिकारी" म्हणजे जिल्ह्यातील अंमलबजावणी अभिकरणाचा उच्चतम अधिकारी किंवा अभिकरणाचे कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये ज्याच्याकडे सोपविण्यात आली आहेत असा कोणताही दुय्यम अधिकारी ;

(फ) "पंचायत समिती क्षेत्रात" कोणत्याही "क" वर्ग नगरपालिका क्षेत्राचा समावेश होतो ;

(ग) "पंचायत समिती पातळीवरील अधिकारी" किंवा "समिती अधिकारी" म्हणजे संबंधित पंचायत समितीच्या क्षेत्रात योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून कलम १० अन्वये नेमलेली तहसीलदाराच्या किंवा गट विकास अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती ;

(ह) "उत्पादक कामे" म्हणजे राज्य शासनाच्या मते, ज्या कामांमुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादनाच्या वाढीस हातभार लागेल किंवा ज्या कामाच्या अभावी उत्पादनाच्या वाढीस प्रतिबंध होईल अशी कामे ;

(आय) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(ज) "ग्रामीण क्षेत्रे" म्हणजे त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये ज्या क्षेत्रांसाठी, महानगरपालिका किंवा कटक मंडळ यांची स्थापना किंवा रचना करण्यात आली असेल अशी, क्षेत्रे आणि हा अधिनियम पारित होण्याच्या तारखेस महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये ज्या क्षेत्रांचे 'अ' किंवा 'ब' वर्ग नगरपालिका क्षेत्र म्हणून वर्गीकरण करण्यात आले असेल अशी क्षेत्रे वगळून महाराष्ट्र राज्यातील सर्व क्षेत्रे आणि हा अधिनियम पारित झाल्यानंतर, महानगरपालिका किंवा कटक मंडळ अधिनियम किंवा 'अ' किंवा 'ब' वर्ग नगरपालिका परिषद यांच्या कक्षेत येणारे कोणतेही क्षेत्र या अधिनियमाच्या कक्षेत समाविष्ट केल्याच्या तारखेपासून ग्रामीण क्षेत्र असण्याचे बंद होईल ;

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

(के) "योजना" म्हणजे, कलम ७ अन्वये तयार करण्यात व प्रसिद्ध करण्यात आलेली आणि त्यावेळी अंमलात असलेली रोजगार हमी योजना.

ग्रामीण क्षेत्रातील प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देणे.

३. महाराष्ट्राच्या ग्रामीण क्षेत्रातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीस काम करण्याचा म्हणजेच अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी हमी दिलेला रोजगार मिळण्याचा आणि या अधिनियमाच्या तरतुदीनुसार व त्याखालील योजनेनुसार त्या कामाची मजुरी दर आठवडयाला किंवा निदान पंधरवडयापेक्षा उशीरा नसेल अशा वेळी मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**—जर एखादी प्रौढ व्यक्ती, कोणतेही विशेष प्रशिक्षण न घेता सर्वसाधारणपणे करू शकत असेल असे एखादे काम असेल आणि ते, तशा प्रकारे योजनेत वर्गीकृत केले असेल, तर त्याला अकुशल समजण्यात येईल.

राज्य परिषद व तिची कामे.

४. (१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा नियतकालिक आढावा घेण्याच्या व तिच्यावर देखरेख ठेवण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद म्हणून या नावाची एक परिषद असेल [1] [या परिषदेचा अध्यक्ष, सभापती आणि इतर सदस्य यांची नेमणूक राज्य शासनाकडून केली जाईल]. या परिषदेच्या इतर सदस्यांची संख्या सव्वीसपेक्षा अधिक असता कामा नये नाही व त्यांपैकी निदान दोन सदस्य तरी मागास वर्गातील व्यक्तींमधून नेमले गेले पाहिजेत.

(२) परिषदेचे अन्य काम, या अधिनियमाशी आणि योजनेशी व त्यांच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे हे असेल.

(३) परिषद ही योजनेचे मूल्यमापन हाती घेण्यास आणि या प्रयोजनासाठी सर्वसाधारणत: महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेशी व ग्रामीण मजुरांच्या सामाजिक-नि-आर्थिक परिस्थितीशी आणि विशेषत: योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित आकडेवारी गोळा करण्यास किंवा गोळा करण्याची व्यवस्था करण्यास सक्षम असेल. त्याचप्रमाणे परिषद या अधिनियमाच्या व योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित विशिष्ट प्रश्न व समस्या यांचा अभ्यास करण्यासाठी एक किंवा अधिक अभ्यास गट नेमण्यासंबंधी राज्य शासनाला शिफारस करण्यास सक्षम असेल.

(४) परिषदेने जिल्हा पातळीवरील समित्यांच्या कामकाजाचा समन्वय साधला पाहिजे.

[2] [(५) अध्यक्ष हा परिषदेचा प्रमुख असेल. अध्यक्ष आणि सभापती हे राज्य शासनास वेळोवेळी विहित करता येतील अशा अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये बजावतील आणि राज्य शासन वेळोवेळी विहित करील असे त्या दोघांमधील परस्परसंबंध असतील.]

जिल्हा व पंचायत समितीच्या पातळीवरील समित्या व त्यांची कामे.

५. (१) राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रोजगार हमी समिती आणि प्रत्येक पंचायत समितीच्या क्षेत्रात पंचायत समिती रोजगार हमी समिती स्थापन केली पाहिजे. प्रत्यक जिल्हा पातळी-वरील समितीमधील आणि पंचायत समिती पातळीवरील समितीमधील किमान दोन सदस्यांची नेमणूक मागास वर्गातील व्यक्तीमधून केली पाहिजे व दोन सदस्यांची नेमणूक एकतर, योजनच्या कामांवर ज्यांना रोजगार पुरविण्यात आलेला आहे अशा व्यक्तींमधून किंवा शेतमजुरांच्या कोणत्याही नोंदणीकृत केलेल्या संघामधून केली पाहिजे. अशा प्रत्येक समितीचा सभापती तिच्या बिनसरकारी सदस्यांमधून नेमला पाहिजे.

(२) या समित्यांनी त्यांच्या संबंधित अधिकारितांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर वेळोवेळी देखरेख ठेवली पाहिजे व तिच्या संबंधात आढावा घेतला पाहिजे आणि या अधिनियमाची अधिक परिणाम-कारक अंमलबजावणी करण्यासाठी त्यांच्या मते आवश्यक असतील अशा उपाययोजना राज्य शासनाला व परिषदेला सुचविल्या पाहिजेत. जिल्हाधिकाऱ्याने आणि संबंधित समिती अधिकाऱ्यांनी, समितीने केलेल्या सूचनांवर त्यांनी केलेल्या किंवा राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी समिती-कडे पाठविली पाहिजे.

(३) प्रत्यक जिल्हा पातळीवरील समितीने जिल्ह्याच्या पंचायत समिती पातळीवरील समित्यांच्या कामकाजाचा समन्वय साधला पाहिजे.

योजनेच्या प्रत्येक जिल्ह्यातील अंमल-बजावणीस जिल्हाधिकारी जबाबदार असणे.

६. प्रत्येक जिल्ह्यातील योजनेच्या अंमलबजावणीस त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी जबाबदार राहील व या प्रयोजनासाठी जिल्ह्यात काम करत असलेले आणि जिल्ह्यापेक्षा मोठे नसेल एवढे क्षेत्र ज्यांच्या अधिकारितेत येत असेल असे, राज्य शासनाचे जिल्हा परिषदेचे व इतर स्थानिक प्राधिकरणाचे किंवा संस्थांचे इतर सर्व अधिकारी जिल्हाधिकाऱ्यास जबाबदार असतील.

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम २ (अ) अन्वय, "राज्य शासन परिषदेचा सभापती व इतर सदस्य नेमील" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये पोट-कलम (५) ची भर घालण्यात आली.

प्रत्येक विभागातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे आयुक्तांचे अधिकार.

[1] [६-अ. (१) विभागाचा आयुक्त किंवा या बाबतीत त्याने पदनिर्देशित केलेला, सहाय्यक आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा कोणताही अधिकारी किंवा कोणतेही अधिकारी, त्या विभागातील योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यास आणि तिचे पुर्नविलोकन करण्यास सक्षम असेल किंवा असतील. योजनच्या अंमलबजावणीबाबत आयुक्त, जिल्हाधिकाऱ्याला (विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांसह), इतर अधिकाऱ्यांना, स्थानिक प्राधिकरणांना आणि इतर संस्थांना निदेश देण्यास सक्षम असेल आणि अशा निदेशांचे पालन करणे हे त्या सर्वांचे अवश्य कर्तव्य असेल.

(२) योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ, विभागातील जिल्हाधिकारी, इतर अधिकारी, स्थानिक प्राधिकरणे आणि इतर संस्था या राज्य शासन निदेश देईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा-रीतीने आयुक्तास जबाबदार व अधीन असतील].

योजना तयार करणे व ती प्रसिद्ध करणे.

७. (१) कलम ३ मध्ये उल्लेख केलेल्या रोजगार हमीची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने ज्या व्यक्ती या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा योजनेमध्ये घालून दिलेल्या शर्तींच्या अधीन, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास स्वत: होऊन तयार असतील अशा ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगार पुरवण्यासाठी एक योजना तयार केली पाहिजे.

(२) योजनेची आवश्यक वैशिष्टचे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) या योजनेखाली केवळ उत्पादक कामेच हाती घेतली जातील.

[2] [परंतु, अतिवृष्टी, पूर, भूकंप, अवर्षण, टंचाई किंवा वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी म्हणून कोणत्याही क्षेत्रात रोजगार पुरविणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास राज्य शासन वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे, तात्पुरत्या कालावधी साठी, राज्य शासनास, उक्त योजनेखाली अशी कामे हाती घेण्यास परवानगी देता येईल.]

(दोन) या योजनेखाली हाती घेतलेली कामे ग्रामीण क्षेत्रात असतील ; तथापि ग्रामीण क्षेत्रांव्यतिरिक्त इतर क्षेत्रात विवक्षित प्रवर्गाची कामे हाती घेता येतील असा राज्य शासनाने निदेश देणे कादेशीर असेल.

(तीन) प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यास या योजनेखाली जिल्ह्यात हाती घ्यावयाच्या कामांचे आराखडे तयार करण्यास सांगण्यात येईल. असे आराखडे हे जिल्हा योजनेचा भाग म्हणून त्याच्याकडून तयार करण्यात येतील. परंतु ते सर्व प्रौढ व्यक्तींना अकुशल अंगमेहनतीचे काम पुरविण्याची रोजगार हमी देण्याच्या दृष्टीने व संबंधित पंचायत समितीच्या क्षेत्रामध्य सहज उपलब्ध होणाऱ्या प्रत्यक्ष किंवा संभाव्य नैसर्गिक साधनसपत्तीचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या, पंचायत समितीच्या क्षेत्र विकास योजनावर आधारलेले असले पाहिजेत. जिल्हाधिकाऱ्याने, हे आराखडे मान्यतेसाठी जिल्हा पातळीवर समितीपुढे ठेवले पाहिजत. या समितीने पंचायत समितीच्या पातळीवरील समित्यांचे दृष्टिकोन विचारात घेतल्यानंतर आपली मान्यता दिली पाहिजे.

(चार) अंगमेहनती काम करणाऱ्या मजुरांसाठी किती मागणी आहे .याचा अंदाज बांधण्यासाठी जिल्ह्यासाठी एक मनुष्यबळ अंदाजपत्रक तयार करण्यात येईल, म्हणजे जिल्ह्यामध्ये बेकारी कोठे कसकशी आहे ते विचारात घेऊन या योजनेखालील कामांची आखणी करणे शक्य होईल.

(पाच) योजनेत, शक्य असेल तेथवर, अकुशल कामगारांच्या कुशलतेच्या प्रशिक्षणाची आणि त्यांची दर्जा वाढ करण्यासाठीही तरतूद करता येईल.

(सहा) मजुरी, ही, प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेवर व प्रमाणावर अवलंबून असेल.

---

[1] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २४, कलम २ अन्वये कलम ६-अ जादा समाविष्ट केले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(सात) दरांच्या अनुसूचीनुसार वेतन देण्यात येईल. हे प्रमाण कामाच्या वेगवेगळ्या प्रकारांसाठी, वेळोवेळी, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आले पाहिजे. साक्षेपाने एका दिवशी ७ तास काम करणाऱ्या व्यक्तीस सर्वसाधारणपणे, राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या सर्वात कमी क्षेत्रातील शेतमजुरांच्या किमान वेतनाइतके एकूण वेतन मिळेल अशा रीतीने दरांची अनुसूची निश्चित केली पाहिजे.

[१] [अतिवृष्टी, पूर, भूकंप, अवर्षण, टंचाई किंवा वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची बाधा पोचलेल्या क्षेत्रामध्ये, अशा कामाची मजुरी राज्य शासन निदेश देईल अशा दैनिक दराने आणि अशा तात्पुरत्या कालावधीसाठी, देता येईल.]

(आठ) योजनेखालील रोजगारासाठी स्वत: होऊन तयार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस समिती अधिकारी योजनेअन्वये अनुज्ञेय असलेले कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी निदेश देऊ शकेल.

(नऊ) योजनेखाली हाती घेतलेली सर्व कामे कोणत्याही कंत्राटदारामार्फत न करता विभागाकडून केली पाहिजेत :

परंतु असे की, अगदी आवश्यक असेल तेथे खडी भरणे, पाझर तलाव व लहान पाटबंधारे तलाव यांच्या उत्प्लव-बांधाचा (वेस्ट-वेअरचा) भाग यांसारखी कुशल कामे उक्त्या कामाच्या दराच्या पद्धतीच्या आधारावर पार पाडता येतील. परंतु अकुशल कामगारांना द्यावयाचे वेतन योजनेनुसार विहित करण्यात आलेल्या कामानुसार असेल.

(दहा) खाजगी जमिनीवर या योजनेखाली ज्या कामांचा प्रत्यक्ष लाभ त्या जमिनींच्या धारकांना होणार आहे अशी कामे हाती घेण्यात येतील तेव्हा, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली किंवा कोणत्याही कार्यकारी आदेशांखाली अशा धारकांना अशा कामांबाबत अर्थसहाय्य मिळण्याचा हक्क आहे अशी वस्तुस्थिती असली तरी, [२][या योजनेखालील अर्थसहाय्य विहित करण्यात येईल अशा दराने रोजगार हमी निधीतून दिले जाईल].

(अकरा) जेणेकरून जिल्ह्यातील शेतीच्या नेहमीच्या कामांवर प्रतिकूल परिणाम होणार नाही आणि एका बाजूने किमान वेतनावर हमीचे काम देण्याचे तत्त्व व दुसऱ्या बाजूने शेतीच्या कामासाठी असणाऱ्या मजूरविषयक गरजा, त्याचप्रमाणे राज्य शासनाची नेहमीची योजनांतर्गत व योजनेतर अशी जी कामे असतात त्यांच्या अंमलबजावणीसाठी असणाऱ्या मजूरविषयक गरजा यांमध्ये समतोल राखला जाईल अशा रीतीने जिल्हाधिकाऱ्याने या योजनेखाली हाती घेण्यात येणाऱ्या कामांचे आयोजन केले पाहिजे.

(बारा) कामांचा योग्य दर्जा राखला जावा, त्याचप्रमाणे कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी दिलेले एकूण वेतन हे केलेल्या कामाच्या दर्जाशी व परिमाणाशी प्रमाणशीर असावे यासाठी राज्य शासनाने, या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचे नियतकालिक निरीक्षण करण्याची तरतूद योजनेमध्ये केली पाहिजे.

(तेरा) राज्य शासनाने या योजनेखाली केलेल्या खर्चाची नियतकालिक लेखापरीक्षा करण्यासाठी एक लेखापरीक्षा पथक नेमण्याची तरतूद या योजनेत केली पाहिजे.

(चौदा) योजनेखाली रोजगारावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिच्या रोजगारामुळे आणि ती रोजगारावर असताना झालेल्या अपघातामुळे कोणतीही वैयक्तिक इजा पोहोचली असेल तर, त्या व्यक्तीला योजनेनुसार अनुज्ञेय असतील असे वैद्यकीय उपचार विनामूल्य करून

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

घेण्याचा हक्क असेल आणि अशा व्यक्तीस रुग्णालयात ठेवणे आवश्यक असेल तेव्हा राज्य शासनाने जागा, उपचार व आहार यांबरोबरच त्या व्यक्तीला रुग्णालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्या व्यक्तीवर रुग्णालयामध्ये उपचार करण्यात येत असतील त्या कालावधीमध्ये त्या व्यक्तीला, खंड (सात) मध्ये निर्देशिलेल्या किमान वेतनाच्या निम्मे इतक्या दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल. अशी व्यक्ती मरण पावल्यास, तिच्या कायदेशीर वारसांना योजनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रीतीने सानुग्रह प्रदान म्हणून पाच हजार रुपये देण्यात येतील. अशी व्यक्ती अपंग झाली तर तिला योजनेनुसार ठरविण्यात येईल तितकी रक्कम सानुग्रह प्रदान करण्यात येईल परंतु अशा प्रकरणामध्ये अशा प्रदानाची रक्कम पाच हजरा रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये.

(पंधरा) या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांस अधीन राहून राज्य शासनाने सर्वसाधारणपणे कोणत्याही कामासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची हत्यारे व अवजारे आणि सुरुंगाची दारू पुरविली पाहिजे आणि या गोष्टी अशा रीतीने पुरविण्यात आलेल्या नसतील व संबंधित व्यक्तीने त्या आणलेल्या असतील तर अशा बाबतीत त्या व्यक्तीला, विहित करण्यात येईल असा भाडे आकार दिला पाहिजे.

(सोळा) राज्य शासनाने शक्य असेल तेथवर जल विभाजक क्षेत्राच्या तत्त्वावर जमीन विकासाचे व्यापक कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. अशी कामे शक्यतोवर, अशा कामांवर लावलेल्या मजुरांच्या गावापासून पाच किलोमीटरच्या परिसरात पुरविली पाहिजेत.

(३) या योजनेखाली स्वत: होऊन काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या नावांची व पत्त्यांची नोंदणी करण्याची या योजनेत तरतूद करण्यात येईल. अशी नोंदणी राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे, ती व्यक्ती जेथे राहते ते गाव ज्याच्या अधिकारितेत येत असेल त्या ग्रामसेवकाच्या किंवा तलाठ्याच्या मुख्यालयामध्ये केली पाहिजे.

(४) अशा रीतीने तयार करण्यात आलेली योजना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे आणि तिचा सारांश राज्य शासन ठरवील अशा प्रत्येक जिल्ह्यात अधिक खप असणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रातून देखील प्रसिद्ध केला पाहिजे.

(५) या कलमाखाली योजना तयार व प्रसिद्ध करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेली राज्य शासनाची रोजगार हमी योजना ही या अधिनियमाखाली तयार केलेली व प्रसिद्ध केलेली योजना असल्याचे मानले जाईल.

प्रसुती व निर्बीजीकरण शस्त्रक्रियांच्या बाबतीत आणि सोबतच्या मुलांना अपघात होणे इ. बाबतीत रजा व सानुग्रह प्रदानाची तरतूद.

[1][७ अ. (१) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून, जी स्त्री तिच्या अपेक्षित प्रसूतीच्या तारखेच्या निकटपूर्वी बारा महिन्यामध्ये; एकशे-पन्नास दिवसांपेक्षा कमी नसणाऱ्या मुदतीसाठी किंवा विहित करण्यात येईल अशा त्याहून कमी मुदतीसाठी, या योजनेन्वये रोजगारावर असेल त्या प्रत्येक स्त्रीला, तीस दिवसांच्या मुदतीकरिता कामावर अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल आणि या मुदतीमध्ये, तिला, ती अशा परवानगी-वरून ज्या तारखेपासून अनुपस्थित राहील त्या तारखेच्या निकटपूर्वीच्या महिन्यात तिला देय असणाऱ्या किंवा तिला देण्यात आलेल्या दैनिक मजुरीइतकी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून घेण्यास परवानगी असेल.

(२) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून, जी व्यक्ती, या योजनेन्वये रोजगारावर असेल व जी संततिनियमन व कुटुंब नियोजन यासाठी म्हणून राज्य शासन याबाबतीत मान्य करील अशी निर्बीजीकरण शस्त्रक्रिया किंवा अन्य कोणतीही शस्त्रक्रिया किंवा उपचार करून घेईल अशा प्रत्येक व्यक्तीला, राज्य शासनाने मान्यता दिलेला वैद्यकीय अधिकारी शिफारस करील अशा, चौदा दिवसांहून अधिक नसणाऱ्या मुदतीसाठी विश्रांती व प्रकृती सुधारण्याकरिता कामावर अनुपस्थित राहण्याची व अशा मुदतीत तिच्या दैनिक सरासरी मजुरीइतकी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून घेण्याची परवानगी असेल.

---

[1]. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २ अन्वये कलम ७-अ जादा दाखल करण्यात आले.

(३) या योजनेन्वये रोजगारावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या सोबत असणाऱ्या मुलास अपघाताने शारिरीक इजा झाली किंवा अशा इजेमुळे अशा मुलाला तात्पुरती, अंशत : किंवा पूर्णतः विकलांगता आली किंवा त्याचा मृत्यू झाला तर त्या व्यक्तीला, त्या मुलाकरिता म्हणून राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशा विनामूल्य वैद्यकीय उपचाराचा हक्क असेल आणि जिल्हाधिकारी किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी ठरवील अशी रक्कम सानुग्रह प्रदान म्हणून मिळण्याचा हक्क असेल; ही रक्कम संबंधित व्यक्तीला होणाऱ्या शारीरिक इजा इत्यादीसाठी कलम ७, पोट-कलम (२), खंड (चौदा) मध्ये घालून दिलेल्या प्रमाणापेक्षा कोणत्याही बाबतीत अधिक असणार नाही.

(४) राज्य शासनास, प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार, त्याला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादणे योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन ठेवून, या कलमात ज्यासाठी तरतूद नाही अशा रोजगार हमी योजनेखालील रोजगारावर असतांना उद्भवणाऱ्या तशाच प्रकारच्या इतर कोणत्याही हालअपेष्टातून किंवा आकस्मिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पाच हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी रक्कम या योजनेन्वये रोजगारावरील कोणत्याही व्यक्तीला सानुग्रह प्रदान म्हणून मंजूर करता येईल.

**हमी दिलेल्या रोजगारासाठी, ग्रामीण क्षेत्रामधील प्रौढ व्यक्तींना लागू असणाऱ्या शर्ती.**

८. (१) (एक) कोणत्याही ग्रामीण क्षेत्रामध्ये राहणाऱ्या ;

(दोन) कोणतेही अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास तयार असणाऱ्या ;

प्रत्येक प्रौढ व्यक्तीस, राज्य शासनाने, या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडे किंवा अधिकाऱ्याकडे (यात यापुढे ज्याचा निर्देश "नोंदणी करणारे प्राधिकरण" असा केला आहे) आपल्या नावाची व पत्त्याची नोंदणी करून घेता येईल. अशा प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर अशा व्यक्तींच्या नावाची व पत्त्याची नोंदणी केली पाहिजे. अशी नोंदणी ही योजनेमध्ये नमूद करण्यात येईल इतक्या कालावधीसाठी असेल व वेळोवेळी तिचे नवीकरण करता येईल. स्वतःच्या वयाचे खोटे प्रतिज्ञापत्र देऊन एखाद्या व्यक्तीने स्वतःची नोंदणी करून घेतली आहे, अशी नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणाची खात्री झाल्यास, त्यास, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकता येईल.

(२) नोंदणी केलेल्या प्रत्येक व्यक्तीस त्यावेळी अंमलात असलेल्या योजनेनुसार रोजगार पुरविला जाण्याचा हक्क असेल.

(३) समिती अधिकाऱ्यास किंवा ग्राम सेवकास किंवा अशी व्यक्ती ज्या गावात रहात असेल ते गाव ज्याच्या अधिकारितेत असेल अशा राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तलाठ्यास अशा प्रत्येक नोंदणीकृत व्यक्तीकडून अशा रोजगार मिळण्याची विनंती करणारे व रोजगार ज्या कालावधीसाठी पाहिजे असेल तो कालावधी व अशी व्यक्ती ज्या कालावधीमध्ये सतत काम करण्यास तयार असेल तो कालावधी—अशा कालावधी एक महिन्यापेक्षा कमी असता कामा नये—नमूद करणारे पत्र मिळाल्यास, अशा व्यक्तीला योजनेच्या तरतुदीनुसार रोजगार पुरविणे हे राज्य शासनाचे कर्तव्य असेल. अशा व्यक्तीला शक्यतोवर, ती जेथे राहत असेल तेथील पंचायत समितीच्या क्षेत्रातील, परंतु कोणत्याही बाबतीत जिल्ह्याच्या बाहेर नसेल अशा, कोणत्याही कामावर रोजगार दिला पाहिजे.

(४) योजनेखाली रोजगार मिळण्यासाठी पाठवलेले पत्र समिती अधिकाऱ्याला किंवा ग्रामसेवकाला किंवा यथास्थिती, तलाठ्याला मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या रीतीने अशा व्यक्तीला योजनेखाली रोजगार पुरविणे राज्य शासनाला शक्य नसेल तर, अशा व्यक्तीला रोजगार हमी निधीमधून, राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशा दरांनी, परंतु दर दिवसास १ रुपयापेक्षा कमी नसेल इतका बेकारी भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(५) पोट-कलम (४) अन्वये बेकारी भत्ता देण्याचे राज्य शासनाचे दायित्व हे, समिती अधिकाऱ्यास किंवा ग्रामसेवकास किंवा यथास्थिती, तलाठ्यास, रोजगारासाठी पाठवलेले पत्र मिळाल्यापासून किंवा १५ दिवस पूर्ण झाल्यानंतर सुरू होईल व समिती अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला, नोंदवहीमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून, योजनेखाली सुरू करण्यात आलेल्या कोणत्याही कामावर हजर होण्याचा निदेश दिल्यानंतर ताबडतोब समाप्त होईल.

(६) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पाऊस किंवा इतर असामान्य नैसर्गिक आपत्ती यांसारख्या माणसाच्या आटोक्याबाहेर असणाऱ्या परिस्थितीमुळे कोणत्याही कालावधीमध्ये पोट-कलम (३) अन्वये रोजगार पुरविण्यास राज्य शासन असमर्थ असेल तर, त्या कालावधीमध्ये पोट-कलम (४) अन्वयेचा बेकारी भत्ता देण्याचे कोणतेही दायित्व राज्य शासनावर असणार नाही.

(७) योजनेखाली मंजूर करण्यात आलेल्या कामांवर तावडतोब रोजगार पुरविणे राज्य शासनास, इष्ट वाटत नसेल तेव्हा, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने, तो निदेश देईल अशा कालावधीसाठी ग्रामपंचायतीनी विहित करण्यात आलेली कामे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याअन्वये स्थापन करण्यात आलेल्या ग्राम सेवायोजन निधीमधून हाती घ्यावीत असे निदेश देणे कायदेशीर असेल. पोट-कलम (३) अन्वये ज्या व्यक्तीकडून पत्र मिळाले असेल त्या व्यक्तीला अशा कामांवर रोजगार पुरविण्यात आला तर, त्या पोट-कलमान्वये तिला रोजगार पुरविण्यात आला आहे असे मानण्यात येईल.

(८) पोट-कलम (४) अन्वये बेकार व्यक्तीला द्यावयाचा बेकारी भत्ता, राज्य शासनाने या-बाबतीत अधिकार दिलेल्या प्राधिकरणाकडून मंजूर केली पाहिजे व दिला पाहिजे आणि या प्रयोजना-साठी राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी कार्यपद्धती विहित करता येईल.

(९) कोणत्याही व्यक्तीने,

(एक) पोट-कलम (३) अन्वये तिला पुरविण्यात आलेला रोजगार स्वीकारला नाही ;

(दोन) कामावर हजर होण्यास कळविण्यात आल्यापासून ७ दिवसांच्या आत ती कामावर हजर झाली नाही ;

(तीन) अंमलबजावणी अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय एक आठवड्यापेक्षा अधिक काला-वधीसाठी ती कामावर सतत गैरहजर राहिली किंवा कोणत्याही महिन्यामध्ये एक आठवड्यापेक्षा अधिक असणाऱ्या एकूण कालावधीसाठी गैरहजर राहिली ;

तर त्या व्यक्तीला पोट-कलम (४) अन्वये कोणताही बेकारी भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

(१०) ज्या व्यक्तीला पोट-कलम (३) अन्वये रोजगार पुरविण्यात आला असेल आणि तो तिने स्वीकारला नसेल किंवा पोट-कलम (९) अन्वये जिने बेकारी भत्ता मिळण्याचा आपला हक्क गमावला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत, बेकारी भत्त्याची मागणी करता येणार नाही ; परंतु या तीन महिन्यांच्या कालावधीत, कोणत्याही कामावर नोकरीवर राहण्यास त्या व्यक्तीस मनाई असणार नाही. समिती अधिकाऱ्याने अशी कसुरीची प्रकरणे संबंधित नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणास कळविली पाहिजेत.

(११) पोट-कलम (३) अन्वये रोजगारासाठी पत्र पाठविणारी कोणतीही व्यक्ती आणि समिती अधिकारी यांच्यामध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास समिती अधिकाऱ्याने तो वाद राज्य शासन विहित करील अशा प्राधिकरणाकडे पाठविला पाहिजे आणि अशा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल. व्यथित व्यक्तीलादेखील वाद थेट प्राधिकरणाकडे निर्देशित करता येईल. राज्य शासनास अशा वादांचा निर्णय देताना अशा प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती तसेच प्राधिकरणाची कामे आणि अधिकार विहित करता येतील.

(१२) पूर्ववर्ती पोट-कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुटुंबामध्ये एकही धडधाकट प्रौढ व्यक्ती नसेल अशा बाबतीत, जिचे वय पंधरा वर्षे पूर्ण असेल अशा, त्या कुटुंबातील अज्ञान व्यक्तीसदेखील पोट-कलम (१) अन्वये तिच्या नावाची व पत्त्याची नोंदणी करण्याचा हक्क राहील व त्या व्यक्तीला तिच्या कामाच्या ठरीव प्रमाणानुसार वेतन दिले पाहिजे ;

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, "कुटुंबातील व्यक्ती" म्हणजे एकत्र राहणारे पती, पत्नी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण.

(१३) पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या, नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणाने विहित करण्यात येईल अशा रीतीने नोंदवही किंवा नोंदवह्या तयार केल्या पाहिजे व ठेवल्या पाहिजेत आणि अशा रीतीने ओळखपत्रे किंवा पासबुके दिली पाहिजेत. नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणाने त्याच्याकडे नोंदणी करण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावांची व पत्त्यांची सूची किंवा सूच्या व अशी इतर माहिती विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा नमुन्यांमध्ये समिती अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

९. (अ) ज्या व्यक्तीला रोजगार असेल परंतु जी, कलम ८, पोट-कलम (३) अन्वये इतरत्र रोजगार मिळण्यासाठी पत्र पाठवील व त्या कलमाच्या पोट-कलम (४) अन्वये बेकारी भत्ता घेईल ; किंवा

**रोजगार असताना बेकारी भत्ता घेतल्याबद्दल शास्ती.**

(ब) कलम ८, पोट-कलम (४) अन्वये जिला बेकारी भत्ता मिळत असेल आणि जी इतर ठिकाणी रोजगार स्वीकारील परंतु ही गोष्ट समिती अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देणार नाही व त्या पोट-कलमान्वये बेकारी भत्ता घेण्याचे चालू ठेवील.

अशा कोणत्याही व्यक्तीला अपराध सिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१०. (१) प्रत्येक पंचायत समितीच्या क्षेत्रामध्ये योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासन संबंधित पंचायत समितीच्या क्षेत्रासाठी समिती अधिकारी म्हणून संबोधावयाचा एक पंचायत समिती पातळीवरील अधिकारी नेमील.

**समिती अधिकारी व त्यांची कामे.**

(२) समिती अधिकारी वेळोवेळी, नोंदणी करणाऱ्या प्राधिकरणाकडून त्याच्याकडे नोंदणी करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे व पत्ते असणारी सूची मिळवील.

(३) योजनेखाली हाती घ्यावयाच्या कामांना राज्य शासनाकडून किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा राज्य शासन या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करील अशा अन्य अधिकाऱ्याकडून, राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, कामांच्या खर्चावरील मर्यादांना अधीन राहून मंजुरी देण्यात येईल. समिती अधिकारी वेळोवेळी, जिल्ह्यातील मंजुरी मिळालेल्या कामांची सूची जिल्हाधिकाऱ्याकडून मिळवील.

(४) कलम ८, पोट-कलम (३) अन्वये, रोजगार मिळण्यासाठी पाठवलेले पत्र मिळाल्यानंतर समिती अधिकारी त्याच्या पंचायत समितीच्या क्षेत्रातील कोणत्या मंजूर कामावर अर्जदारास पाठवावे ते ठरवील आणि त्यानुसार अर्जदारास व कामाच्या अंमलबजावणीचा प्रभारी असणाऱ्या अधिकाऱ्यास देखील कळवील. अशा व्यक्तीला आपल्या पंचायत समितीच्या क्षेत्रातील कोणत्याही कामावर पाठवणे समिती अधिकाऱ्यास शक्य नसेल तर त्यास, जिल्हाधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय करून त्या व्यक्तीस पंचायत समितीच्या क्षेत्राबाहेर परंतु जिल्ह्यामध्येच असलेल्या एखाद्या कामावर पाठवता येईल.

(५) जिल्हाधिकारी आणि जिल्ह्यातील इतर अंमलबजावणी अभिकरणे ही राज्य शासनाने त्यांच्या ताब्यात दिलेल्या निधीसाठी जबाबदार असतील. ते विहित करण्यात येईल अशा रीतीने रोजगार आणि खर्च यांचे लेखे ठेवतील.

इतर कामांवरील रोजगारासाठी तरतूद. ११. (१) या योजनेखाली हाती घेण्यात आलेले कोणतेही काम पूर्ण करण्यात आले असेल आणि अशा कामावर यापुढे अकुशल कामगारांना रोजगार देणे शक्य नसेल अशावेळी ही वस्तुस्थिती जिल्हाधिकाऱ्यांना त्याचप्रमाणे संबंधित समिती अधिकाऱ्याला कळविणे हे संबंधित अंमलबजावणी अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. त्यानंतर अशा कामांवर रोजगार देण्यात आलेल्या व्यक्तींना या योजनेखाली यापूर्वीच हाती घेण्यात आलेल्या दुसऱ्या कोणत्याही कामावर पाठविणे किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा यथास्थिती, राज्य शासनाच्या मंजुरीने या योजनेखाली सुरू करावयाच्या एखाद्या कामावर पाठविणे हे त्या समिती अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) काम पूर्ण झाल्याची सूचना मिळाल्यापासून चार दिवसांच्या आत अशा कामावर लावलेल्या कामगाराला पोट-कलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्या योजनेखालील दुसऱ्या कोणत्याही कामावर पाठविणे समिती अधिकाऱ्याला शक्य नसेल तर, राज्य शासन पाचव्या दिवसापासून पुढे संबंधित व्यक्तीला कलम ८ च्या पोट-कलम (४) प्रमाणे असेल असा बेकारी भत्ता देईल.

(३) समिती अधिकाऱ्यांकडून पोट-कलम (२) अन्वये ज्या व्यक्तीला त्या योजनेखालील इतर कोणत्याही कामावर हजर होण्यास सांगण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, समिती-कडून तसे करण्याबाबत निदेश देण्यात आल्यानंतर ७ दिवसांच्या आत असे करण्यात कसूर केली तर ती व्यक्ती जणू काही कलम ८ च्या पोट-कलम (९) व (१०) खाली अपात्र ठरली आहे अशा रीतीने तिला बेकारी भत्ता मागण्याचा हक्क नसेल.

(४) समितीने संबंधित व्यक्तीला त्या योजनेखालील अस्तित्वात असलेल्या किंवा अद्याप सुरू व्हावयाच्या दुसऱ्या एखाद्या कामावर हजर राहण्याचा निदेश दिल्यानंतर, पोट-कलम (२) अन्वये बेकारी भत्ता देण्याचे राज्य शासनाचे दायित्व तात्काळ समाप्त होईल.

रोजगार हमी निधीची स्थापना आणि योजनेसाठी त्याचा वापर करणे. १२. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून रोजगार हमी निधी म्हणून संबोधावयाचा एक निधी स्थापन करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(२) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ व महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९७५ या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या रोजगार हमी निधीमध्ये जमा असलेली कोणतीही रक्कम या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या निधीमध्ये हस्तांतरित होईल आणि ती त्याचा भाग होईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(३) पुढील गोष्टी त्या निधीचा भाग होतील किंवा त्यामध्ये भरण्यात येतील :—

(अ) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ३० अन्वये आणि महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या कलम ४ अन्वये निधीमध्ये हस्तांतरित केलेल्या रकमा आणि उक्त अधिनियमांमध्ये घालून देण्यात आल्याप्रमाणे राज्य शासनाने द्यावयाच्या अनुरूप अंशदानाच्या रकमा ;

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(ब) राज्य शासनाने, केंद्र सरकारने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने दिलेली कोणतीही अंशदाने किंवा अनुदाने;

(क) इतर संस्थांकडून किंवा व्यक्तींकडून—मग त्या विधिसंस्थापित असोत वा नसोत—मिळालेल्या रकमा.

(४) निधीमध्य हस्तांतरित केलेली किंवा जमा केलेली कोणतीही रक्कम, ही राज्याच्या एकत्रीकृत निधीवरील भारित रक्कम म्हणून राहील.

(५) निधीमध्ये जमा असलेली रक्कम, [१] [या अधिनियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणेचा प्रशासनिक खर्च भागविणे व सानुग्रह प्रदान करणे या बाबी धरून] या योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींना अधीन राहून खर्च केला पाहिज.

(६) रोजगार निर्माण करणे किंवा उत्पादक मत्तांची निर्मिती करणे किंवा ही दोन्हीही ज्यांची उद्दिष्टे आहेत अशा इतर विभागीय योजना किंवा योजनांतर्गत योजना यांच्याकरिता वापरण्यासाठी निधी तात्पुरता वळविण्यास राज्य शासनाला, त्या किंवा पुढील वित्तीय वर्षामध्ये अशा रकमेद्वारे निधीची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या शर्तीच्या अधीन राहून परवानगी देता येईल.

(७) हा निधी राज्य शासनाच्या सचिवांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष सूचनांना अधीन राहून राज्य शासनाच्या वतीने धारण केला पाहिजे आणि त्याचे व्यवस्थापन केले पाहिजे.

**विवक्षित अधिनियमांतील सुधारणा व इतर कायद्यामधील योजना व निधी यांच्या निर्देशांचा अर्थ लावण्यासाठी नियम.**

१३. (१) अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिनियम, तिच्या तिसऱ्या स्तंभामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र राज्यामध्ये त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामधील किंवा कोणत्याही लेखांमधील रोजगार हमी योजना किंवा राज्य शासनाचा निधी यासंबंधीच्या सर्व निर्देशांचा अर्थ या अधिनियमाखालील योजना किंवा यथास्थिती, निधी असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

**अधिकारांचे प्रत्यायोजन.**

१४. राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील, अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, शासनाने वापरण्याजोगे, योजना आणि नियम [२] [ * * * * ] तयार करण्याच्या अधिकारांव्यतिरिक्त इतर अधिकार हे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी काही परिस्थिती व शर्ती असतील तर त्या परिस्थितीमध्ये व त्या शर्तींखाली, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनी देखील वापरण्याजोगे असतील.

**सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण देणे.**

१५. हा अधिनियम किंवा त्याखाली तयार करण्यात आलेली योजना किंवा नियम यांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासन किंवा कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी किंवा संस्था किंवा व्यक्ती यांविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.**

१६. या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली तयार केलेली किंवा काढलेली योजना, नियम, अधिसूचना किंवा आदेश, हे, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा अशा कायद्याच्या आधारे परिणामक असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील.

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ४ अन्वये "आणि कलम १२, पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेली सुशिक्षित बेकारांसाठी योजना" हा मजकूर वगळण्यात आला.

नियम तयार करण्याचे अधिकार.

१७. (१) या अधिनियमान्वये नियम तयार करावयाचे अधिकार राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वापरण्यायोग्य असतील.

(२) या अधिनियमामध्ये इतरत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारांना बाध न आणता या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला या अधिनियमाशी सुसंगत असे नियम तयार करता येतील.

(३) या अधिनियमाखालील सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरची अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून, यथास्थिति असा फेरबदल अशा केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

## अनुसूची

(कलम १३ पहा)

| अनुक्रमांक (१) | संक्षिप्त नाव व अधिनियम क्रमांक (२) | सुधारणा (३) | |
|---|---|---|---|
| १ | मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१.) | कलम १५अ-एक मधील "महाराष्ट्र राज्यात" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. | सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. |
| २ | महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७). | कलम ६-अ मधील, "महाराष्ट्र राज्याच्या" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. | १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. |
| ३ | महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यांमध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४ (सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०). | कलम ३ मधील "महाराष्ट्र राज्यात" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल. | १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. |
| ४ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६). | कलम ३० च्या,—<br>(अ) पोट-कलम (१) मधील,—<br>(एक) "या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, रोजगार हमी निधी नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल," हा मजकूर वगळण्यात येईल. | |

**अनुसूची--चालू**

| | अनुक्रमांक (१) | संक्षिप्त नाव व अधिनियम क्रमांक (२) | सुधारणा (३) |
|---|---|---|---|
| सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. | | | (दोन) "त्या निधीकडे" या शब्दांऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या रोजगार हमी निधीकडे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) पोट-कलम (२) मधील, "पोट-कलम (१) अन्वये निधीकडे हस्तांतरित केलेल्या रकमेइतक्या रकमेचे अंशदान त्या निधीस" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :--<br>"पोट-कलम (१) अन्वये त्या निधीकडे हस्तांतरित केलेल्या रकमेइतके अंशदान रोजगार हमी निधीस";<br>(क) पोट-कलमे (३), (४), (५) व (६) ही वगळण्यात येतील.<br>(ड) सामासिक टीपेऐवजी, पुढील सामासिक टीप दाखल करण्यात येईल :-- |
| सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. | | | "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये स्थापन केलेल्या निधीत कराच्या निव्वळ उत्पन्नाइतकी रक्कम व अनुरूप अंशदान देणे.". |
| सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. | ५ | महाराष्ट्र कर अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९७५ (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७). | कलम ४ च्या,--<br>(अ) पोट-कलम (१) मधील "महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ३० अन्वये" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ब) पोट-कलमे (३) व (४) ही वगळण्यात येतील. |

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटोल,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शामुना—ए–१८६८–भासंमरामुं–९-८५–२,५८५–पीसी४*

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे—

- **संचालक**

  मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  प्रकाशन शाखा, नेताजी सुभाष मार्ग मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३५९१४६.

- **पर्यवेक्षक**

  शासकीय ग्रंथागार
  (केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
  (फक्त स्थानिक विक्रीकरिता)
  युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१,
  वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
  मुंबई ४०० ००१
  दूरध्वनी : २९७५९४.

- **पर्यवेक्षक**

  शासकीय ग्रंथागार
  बडवे बिल्डिंग, भांडारकर इन्स्टिटयूट मार्ग, तिसरा मार्ग
  पी. वाय. सी. जिमखान्याजवळ, पुणे ४११ ००४,
  दूरध्वनी : ५६७५९.

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : २२६१५.

- **पर्यवेक्षक**

  शासकीय ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ५५२५.

- आणि

  - महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते